जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 JUN 2019

तरुण भारत

# नियतकालिक स्पर्धेत 'विवेकानंद' प्रथम

## शिवाजी विद्यापीठाकडून फिरता चषक देऊन सन्मान

प्रतिनिधी
कोल्हापूर

सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम राखत विवेकानंद कॉलेजच्या 'विवेक' नियतकालिकाने शिवाजी विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसाईक गटामध्ये पाचव्यांदा प्रथम क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. यापूर्वी या महाविद्यालयाने या स्पर्धेत पाच वेळा प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे.



कोल्हापूर : प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फिरते चषक स्विकारताना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. बी. के. गोसावी. सोबत डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील आदी.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर व 'विवेक'चे संपादक प्रा. बी. के. गोसावी यांना चषक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

डॉ. शिर्के म्हणाले, शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच अधिक दर्जेदार नियतकालिके निघाली पाहिजेत. वाचनसंस्कृती जगण्यासाठी त्याचे ऑनलाईन प्रसारण होऊन ते सर्व घटकांपर्यंत पोहोचले पाहिजे.

प्राचार्य डॉ. होनगेकर म्हणाले, विद्यापीठाने अशा गुणी विद्यार्थ्यांचा समारंभपूर्वक यथोचित सत्कार करुन त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कॉलेजच्या या यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी विवेक संपादक मंडळ व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

12 JUN 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चांगले नागरिक घडवण्याची जबाबदारी शिक्षकांची

## कुलगुरु डॉ.देवानंद शिंदे : स्वाभिमानी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक सेवाभावी संघातर्फे पुरस्कार वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर




**कोल्हापूर : स्वाभिमानी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक सेवाभावी महासंघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'तरुण भारत'चे पत्रकार सुरेश पाटील आणि अहिल्या परकाळे यांना पुरस्काराने गौरविताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, परमात्माराज महाराज, शिक्षक नेते दादा लाड आणि मान्यवर.**

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सर्वात महत्वाची व्यक्ती म्हणजे शिक्षक. त्याचे जीवन घडवण्याचे काम हे शिक्षकांचे आहे. विद्यार्थ्यांमधून चांगला नागरिक घडावा, यासाठी त्याला अधिक समृद्ध करण्याची जबाबदारी शिक्षकांनी पेलली पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. स्वाभिमानी प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक सेवाभावी संघातर्फे मंगळवारी शाहू स्मारक भवनमध्ये शिक्षक व समाजसेवक गौरव पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी आडी देवस्थानचे परमात्मराज महाराज होते. यावेळी विविध क्षेत्रातील चांगली कामगिरी केलेले शिक्षक, संस्था, पत्रकार यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या अंगभुत गुणांचा विकास होत असतो. हा विकास साधण्याचे काम शिक्षकवृंद करत असतो. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात इतरांच्या बरोबरीने शिक्षकांचेही महत्व वाढले आहे. गुरू म्हणून ते निश्चितपणे पार पाडतील, असा विश्वास कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात समाजासाठी कार्य करणाऱ्या पत्रकारांचाही शिक्षकांच्या बरोबरीने सन्मान होत असल्याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी गौरवोद्गार काढले.

परमात्मराज महाराज म्हणाले, माणसाला अधिक जोमाने काम करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्कार असतो. शिक्षण आणि पत्रकारीता हे क्षेत्र समाजसेवेचे आहे. त्याच्याशी प्रत्येकाने इमान राखण्याची गरज आहे.


दरम्यान मान्यवरांच्या हस्ते शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मंडळींचा शिक्षक व पत्रकार यांना गौरविण्यात आले. यामध्ये समाजभूषण पुरस्काराने 'तरुण भारत'चे पत्रकार सुरेश पाटील आणि अहिल्या परकाळे यांचा कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. मुरगूडचे निवृत्त प्राचार्य, ज्येष्ठ पत्रकार व लेखक जीवनराव साळोखे यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मातिक करण्यात आले. आदर्श शिक्षण संस्था पुरस्काराने सेंट झेवियर्स हायस्कूलला गौरविण्यात आला. यावेळी शिक्षक, प्राचार्य, प्राध्यापक यांनाही गौरवण्यात आले. स्वागत-प्रास्ताविक संस्थापक सुधाकर निर्मळे यांनी केले. आभार भास्कर चंदनशिवे यांनी मानले.

यावेळी सहकार परिषद अध्यक्ष शेखर चरेगांवकर, शिक्षण उपसंचालक सुरेश आवरी, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी आशा उबाळे, शिक्षक नेते एस. डी. लाड, अर्जुन पाटील, गौतम वर्धन, राजेंद्र माने, अभिजीत गायकवाड, मिलींद बारवडे, भाऊसाहेब सकट, डी.ए.जाधव, संजय मगदूम आदी उपस्थित होते.

पुढारी

# मराठी भाषा विश्वविद्यालय व्हावे!

## • १९३२ सालच्या कोल्हापूर साहित्य संमेलनात झाला होता ठराव




## • मराठी भाषा संवर्धनाच्या चळवळीचे कोल्हापूर हे केंद्र

> मराठी भाषेचे विश्वविद्यालय व्हावे, हा ठराव १९३२ साली कोल्हापुरात झालेल्या संमेलनात करण्यात आला. नुसता ठरावच झाला नाही तर यासाठी विशेष मान्यवरांची समिती स्थापन करण्यात आली होती. मराठी भाषेच्या भल्यासाठी कोल्हापुरातून ठोस प्रयत्न सुरू होते याचे हे महत्त्वाचे उदाहरण आहे.
>
> - **प्रा. डॉ. रणधीर शिंदे,** विभागप्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर : विजय पाटील**

पुढारी विशेष

मायबोलीच्या संवर्धनासाठी आणि वाढीसाठी मराठी भाषेचे विश्वविद्यालय स्थापन करण्यात यावे, असा ठराव कोल्हापूर येथे १९३२ साली झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात करण्यात आला होता. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष छत्रपती राजाराम महाराज होते. मराठी भाषेचा प्रसार आणि संवर्धनाच्या चळवळीचे रणशिंग यानिमित्ताने ८७ वर्षांपूर्वी कोल्हापुरातून फुंकण्यात आले होते. मराठी भाषा अनिवार्य करण्याच्या सध्याच्या लोकचळवळीच्या निमित्ताने ही आठवण प्रेरणादायी आहे.

मराठी माणूस आपल्या भाषेला मायबोली म्हणतो. म्हणजे भाषा ही आईच आहे, अशी ही भावना आहे. मराठी मुलुखावर अनेक आक्रमणे झाली. परकियांची सत्ता दीर्घकाळ होती; पण या काळातही मराठी भाषा टिकली आणि वाढलीसुद्धा. छत्रपती शिवरायांनी मराठी भाषेला अधिक संपन्न केले. स्वराज्याचा कारभार आणि व्यवहार मराठीतून केला. फारसी भाषेचा तत्कालिन स्वभाषेवर प्रभाव होता. छत्रपती शिवरायांनी फारसी भाषेतील शब्दांना पर्यायी शब्द निर्माण करण्यासाठी विशेष तज्ज्ञांची नियुक्ती केली होती. मराठी भाषेचे शुद्धीकरण त्यांनी केले. यानंतरच्या काळात इंग्रजी सत्तेने पावणेदोनशे वर्षे देशावर सत्ता गाजवली. या काळात सर्वत्र इंग्रजी भाषेचाच पगडा देशभर निर्माण होत राहिला. या काळातही म राठी भाषेचा संकोच झाला नाही. मात्र, इंग्रजी ही ज्ञानभाषा म्हणून उदयाला आली. इंग्रजीचा बोलबाला वाढत राहिला. व्यवहाराची भाषा इंग्रजी होत राहिली. याचा परिणाम देशातील सर्वच प्रादेशिक भाषांवर झाला, तसा मराठीवरही होत आहे. सध्याची पिढी मोठ्या प्रमाणावर थेट इंग्रजीत शिकू लागल्याने भविष्यात मराठी भाषेचे काय होणार? हा प्रश्न उपस्थित होऊलागला आहे. सीबीएसई, आयसीएसई व आयबी या अभ्यासक्रमांमध्ये मराठी भाषा हा विषयच नाही. सध्या या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या मुलांचे प्रमाण मोठे आहे. नव्या पिढीलाही सध्या आपल्या भाषेबद्दल आस्था दिसत नाही. त्यामुळे ही पिढी इंग्रजी आणि हिंदीमिश्रीत मराठी बोलत आहे.

मराठी भाषेच्या सध्याच्या या आव्हानात्मक काळात राज्यभर मराठीच्या भल्यासाठी ही लोकचळवळ सुरु झाली आहे. मराठी भाषा सर्वच स्तराव अनिवार्य करा, अशी मागणी घेऊन राज्यात विविध उपक्रम सुरू झाले आहेत. या स्वागतशील चळवळीला कोल्हापूरकरांनी १९३२ सालापासून मूर्त स्वरूप दिल्याचे दिसून येते.

कोल्हापुरात तत्कालिन आयर्विन म्युझियममध्ये (सध्याचे कलेक्टर ऑफिस) साहित्यसंमेलन झाले होते. या संमेलनाचे अध्यक्ष बडोद्याचे महाराजा सयाजीराव गायकवाड होते. मात्र, ते प्रत्यक्ष संमेलनास येऊ शकले नाहीत. मात्र, त्यांचे लिखित भाषण वाचून दाखविण्यात आले होते. या संमेलनास दहा हजार लोकांनी उपस्थिती लावली होती. अत्यंत थाटामाटात झालेल्या या संमेलनात मराठी भाषेच्या हितासाठी व्यापक दृष्टिकोनातून ठराव करण्यात आले. यामध्ये मातृभाषेतून शिक्षण देणारे विश्वविद्यापीठ स्थापण्याचा विशेष ठराव करण्यात आला होता. हा भाषेच्या प्रसारासाठी आणि संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठराव ८७ वर्षांपूर्वी करण्यात आला होता. सध्याच्या मराठीच्या भल्यासाठी या चळवळीच्या निमित्ताने ही आठवण प्रेरणादायी आहे.

12 JUN 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे ज्ञान समृद्ध करावे

## डॉ. देवानंद शिंदे : शिक्षक-समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांचे जीवन घडवण्याचे महत्त्वाचे काम हे शिक्षकांचे आहे. विद्यार्थ्यांमधून चांगला नागरिक घडावा, यासाठी त्याचे ज्ञान अधिक समृद्ध करण्याची जबाबदारी शिक्षकांची असून त्यांनी ती पेलली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. ते पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.



कोल्हापूर : शिक्षक सेवाभावी संघातर्फे पुरस्कार सोहळ्यात दै. 'पुण्यनगरी'चे उपसंपादक उदयसिंग देशमुख यांना कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. (छाया : पांडुरंग पाटील)

स्वाभिमानी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक सेवाभावी संघातर्फे मंगळवारी शाहू स्मारक येथे शिक्षक व समाजभूषण गौरव पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी आडी देवस्थानचे परमात्मराज महाराज, सहकार परिषद अध्यक्ष शेखर चरेगावकर, शिक्षण उपसंचालक सुरेश आवारी, शिक्षणाधिकारी आशा उबाळे, शिक्षक नेते एस. डी. लाड, दादा लाड, अर्जुन पाटील, गौतम वर्धन आदी मान्यवर उपस्थित होते. स्वागत-प्रास्ताविक संस्थापक सुधाकर निर्मळे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील चांगली कामगिरी केलेले शिक्षक, संस्था, पत्रकार यांना विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी परमात्मराज महाराज, शेखर चरेगावकर, सुरेश आवारे यांनी मनोगत व्यक्त करताना स्वाभिमानीचा गौरव केला.

यावेळी समाजभूषण पुरस्कार दै. 'पुण्यनगरी'चे उपसंपादक उदयसिंग देशमुख यांना कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तसेच पत्रकार प्रवीण मस्के व अहिल्या परकाळे यांचाही गौरव करण्यात आला, तर आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार सेंट झेवियर्स हायस्कूलला देण्यात आला. जीवनगौरव पुरस्कार जीवन साळोखे यांना देण्यात आला. यावेळी शिक्षक, प्राचार्य, प्राध्यापकांनाही गौरवण्यात आले. आभार भास्कर चंदनशिवे यांनी मानले.

यावेळी राजेंद्र माने, अभिजित गायकवाड, मिलिंद बारवडे, भाऊसाहेब सकट, डी. ए. जाधव, संजय मगदूम यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.